# 0206

**A**

Total No. of Questions—**16**

Total No. of Printed Pages—**4** **Regd. No.**

**Part II**

# MARATHI, Paper II

**(Second Language)**

***Time : 3 Hours]*** ***[Max. Marks : 100***

**Note : — सर्व** प्रश्न सोडवा.

विभाग 'अ'

**1.** पुढीलपैकी **एका** कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट लिहा : 1×8=8

(1) तूं येरे बा विठ्ठला

(2) बहरतील मळे.

**2.** खालीलपैकी कोणत्याही **एकाचे** उत्तर लिहा : 1×6=6

(1) कामगारांच्या जीवनाचे चित्रण कवीने कसे रेखाटले आहे ?

(2) कुसुमाग्रजांनी तत्कालीन परिस्थितीचे वर्णन या कवितेतून कसे केले आहे ?

**3.** खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा : 1×6=6

(1) लेखकाच्या घरी बाग फुलविण्यामागे उन्नीकृष्णनच्या कोणत्या भावना होत्या ?

(2) चिनी शिपायांनी डोग्रा जवानास का मारले व लेखकास काय बजावले ?

**4.** पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 2×4=8

(1) 'विडंबन' ह्या विनोद प्रकाराचे स्वरूप स्पष्ट करा.

(2) गुंडगुळ्याच्या माळावरून जातांना तुकारामाच्या मनात कोणकोणते विचार येत होते ?

(3) या पाठातील अतिशयोक्तीचे कोणकोणते प्रसंग सांगितले आहेत ?

(4) धत्तुऱ्याने कोणकोणती रूपे घेतली ? वनातील झाडे व फुले त्याला का हसू लागली ?

**5.** पुढीलपैकी कोणत्याही **दोन** संदर्भासह स्पष्टीकरण करा : 2×4=8

(1) सर्वांभूतीं सम ठेवूनीयां बुद्धी। सांडावि उपाधी प्रपंचाची॥

(2) पक्व जालिया इंद्रावन। अमृतफळ से दिसे दुरुन।
हाती धरु नये, कडूपण। तद्न्याये कपटयाचे॥

(3) धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्याने वर्तावें। ईशासाठी॥

(4) असा कसा मग मुकाच झालो! चर्चा केली नको नको ती;
हास्याच्या उठल्या लहरी, पण मनात लपले मनचे मोती.

6. पुढील वाक्यांपैकी कोणत्याही **दोनां**चे संदर्भासह स्पष्टीकरण करा : 2×4=8

(1) स्वप्नांच्या माध्यमातूनच माणूस यशस्वितेपर्यंत पोहचतो, मग या मार्गावर कितीही संकटे आली किंवा विलंब झाले तरी.

(2) 'आज आपल्या लग्नाचा वाढदिवस तर नाही ना ?'

(3) आता तो एकटाच शिपाई आमच्या तिघांवर पहारा करीत होता.

(4) "तुम्ही तो यंत्रमानव पाठवलाय तो, त्यान उच्छाद मांडलाय.

7. पुढीलपैकी **दोन** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 2×3=6

(1) पानांनी देवाकडे कोणती प्रार्थना केली ?

(2) राबणाऱ्या स्त्रीचे वर्णन विविध प्रतिमांतून कसे आले आहे, ते लिहा.

(3) आपण आपले एक छोटे नगर वसवू असे कवी का म्हणतात ?

(4) 'छत्ररूपी हात' या प्रतिमेचे स्पष्टीकरण करा.

8. पुढीलपैकी **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 2×3=6

(1) यंत्रमानव सांगकाम्या आहे हे उदाहरणासह स्पष्ट करा.

(2) लेखिकेला हिराची आई का आवडली ?

(3) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलामांनी लता मंगेशकर यांची कोणती आठवण सांगितली ?

(4) फ्रामरोझचे आयुष्य कसे सार्थकी लागले ? स्पष्ट करा.

9. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 4×1=4

(1) हरिनाम गाण्याची कोणती रीत नामदेवांना मंजूर आहे ?

(2) साधुपुरुषांचे अंतर कशाने वोसंडत असते ?

(3) ज्योतीरावांच्या मते 'पंगू' कोण आहेत ?

(4) समरपुराचे वारकरी कोणास म्हटले आहे ?

**10.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 4×1=4

(1) फ्रामरोझ कोठे स्थाईक झाला ?

(2) बालपणी आपण कोणाला आदर्श मानतो ?

(3) मुरुडला असतांना लेखिकेची कोणाशी जवळीक झाली ?

(4) लेखक पुलाखालून वाहत जातांना कोणत्या नदीत पोहचणार होते ?

**विभाग 'ब'**

**11.** पुढीलपैकी **एका**चे उत्तर लिहा : 1×5=5

(1) अग्रलेख म्हणजे काय ? अग्रलेखाचा वापर संपादक कशासाठी क़रतात ?

(2) आर.जे. (रेडिओ जॉकी) कडे कोणती स्वभाव वैशिष्ट्ये असायला हवांत ?

(3) सूत्रसंचालकाच्या अंगी कोणकोणते गुण असावेत ?

**12.** पुढील **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा : 1×5=5

(1) स्वल्पविराम चिह्न केव्हा वापरतात ? उदाहरणासह स्पष्ट करा.

(2) पुढील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा :

(1) पोटात कावळे ओरडणे

(2) तगादा लावणे

(3) हुडहुडी भरणे

(4) अनभिज्ञ असणे

(5) गळ घालणे.

**13.** (अ) पुढील शब्दांना **दोन** समानार्थी शब्द लिहा : 5×1=5

(1) सुवर्ण

(2) राजा

(3) चंद्र

(4) गृह

(5) कमळ.

(आ) गटात न बसणारा शब्द ओळखा : 5×1=5

(1) प्रसिद्ध –

(अ) लोकप्रिय (ब) सर्वज्ञात (क) कुविख्यात

(2) ढग –

(अ) वात (ब) जलद (क) मेघ

(3) प्राणी –

(अ) घोडा (ब) बैल (क) पोपट

(4) फूल –

(अ) पुष्प (ब) तरू (क) सुमन

(5) भाजी –

(अ) पालक (ब) चुका (क) सफरचंद

**14.** खालील शब्द जोडून नवीन शब्द तयार करा : 5×1=5

(1) कार

(2) गृह

(3) उदय

(4) अती

(5) गती

**15.** पुढील शब्दांचे अर्थ सांगा : 5×1=5

(1) मिलमिशा

(2) गुमान

(3) ठणाणा

(4) डकविणे

(5) चतुराई

**16.** पुढीलपैकी **एका** विषयावर निबंध लिहा : 1×6=6

(1) आवडता खेळ

(2) आजची स्त्री

(3) रक्तदान – सर्वश्रेष्ठ दान.